




RNI NO. MAHMAR/2020/84035

BAHUJAN SAURABHA

# बहुजन सौरभ








बुधवार ०८ ऑक्टोबर २०२५ | वर्ष : ५ | अंक : १९९ | दैनिक | किंमत : ₹ ५/-

Wednesday, 08 October 2025 | Year : 5 | Issue : 199 | Daily | Rate: Rs. 5/-


# सरन्यायाधीशांवर हल्ला : देशभर संतापाची लाट

### न्यायसंस्थेचा सन्मान राखण्याची मागणी

### राजकीय पक्ष, वकील संघटना आणि नागरिक संघटनांकडून तीव्र निषेध;

### बार कौन्सिलने आरोपी वकिलाची सनद रद्द

**नवी दिल्ली :** सर्वोच्च न्यायालयात सोमवारी घडलेल्या अभूतपूर्व घटनेने संपूर्ण देश हादरला आहे. सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांच्या दिशेने एका वकिलाने बूट फेकण्याचा प्रयत्न केला. सुरक्षा कर्मचाऱ्यांनी त्वरित हस्तक्षेप करून आरोपीला ताब्यात घेतले, परंतु न्यायालयीन सभागृहात काही क्षणासाठी तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले. या घटनेनंतर देशभरात निषेधाची लाट उसळली असून, सर्व स्तरांवरून न्यायसंस्थेचा सन्मान राखण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

### सरन्यायाधीश गवईच नाही, जॉर्ज बुश ते मनममोहन सिंग 'या' बड्या नेत्यांवरही झाली आहे बूटफेक,

**जॉर्ज बुश :** 14 डिसेंबर 2008
**हिलरी क्लिंटन :** 10 एप्रिल 2014
**लालकृष्ण आडवाणी :** एप्रिल 2009
**माजी पंतप्रधान मनमोहन सिंग :** 2009
**पी. चिदंबरम :** 2009
**पत्रकार जरनैल सिंग :** 2009
**काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला :** 15 ऑगस्ट 2010
**काँग्रेस अध्यक्ष राहुल गांधी :** जानेवारी 2012
**अरविंद केजरीवाल :** 9 एप्रिल 2016
**भारताचे सरन्यायाधीश बी. आर. गवई :** 6 ऑक्टोबर 2025



"आपण जगा आणि इतरांनाही जगू द्या असे तत्व आहे. पण कायदा हातात घेऊन अराजकता माजवण्याचा या देशात कुणालाही अधिकार नाही. कृपया आपले प्रश्न आपण शांततेने व संवैधानिक मार्गाने सोडवून घ्यावेत अशी मी सर्वांना विनंती करते, असे म्हणत त्यांनी आपल्या मागण्यांसाठी घटनात्मक मार्गांचा अवलंब करण्याचे आवाहन केले आहे.

– आई कमलताई गवई

### भागवतांच्या आवाह्ना नंतर, चार दिवसांनीच सरन्यायाधीश गवईंवर बूट फेकला

**नागपूर :** सरन्यायाधीश बी.आर. गवई यांच्यावर काल (सोमवारी) सर्वोच्च न्यायालयात एका 71 वर्षीय वकिलाने बूट फेकण्याचा अयशस्वी प्रयत्न केला होता. या प्रकारामुळे देशभरातून संतापजनक प्रतिक्रिया उमटत आहेत. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा नुकताच शताब्दी सोहळा साजरा झाला. यावेळी मार्गदर्शन करताना भागवत यांनी कायदा हातात घेण्यावरून जनतेचे कान टोचले होते. माथेफिरूच्या सांगण्यावरून किंवा कुठल्यातरी दबावाला बळी पडून गुंडगिरी करणे, हिंसाचार करणे, कायदा हातात घेणे या वाईट प्रवृत्ती असल्याचे त्यांनी सांगितले होते. असे असतानाही चार दिवसातच सर्वोच्च न्यायालयात अशी अनुचित घटना घडली. सरकार आणि प्रशासनाचे समाजापासून, समाजाच्या प्रश्नांपासून दुर्लक्ष, कार्यक्षम आणि लोकाभिमुख प्रशासकीय प्रक्रियांचा अभाव ही जनतेचा असंतोष वाढण्याची नैसर्गिक कारणे आहेत. मात्र यासाठी हिंसक आंदोलन हा पर्याय राहू शकत नाही. आपले शेजारी देश सांस्कृतिकदृष्ट्या भारताशी जोडलेले आहेत. भारताच्या हितासाठी या देशांमध्ये शांतता, स्थिरता, प्रगती होणे अत्यंत आवश्यक आहे असेही भागवत म्हणाले.

#### देशभरातील निषेध

* या घटनेचा बार कौन्सिल ऑफ इंडियाने तीव्र निषेध करत राकेश किशोर यांची वकिली सनद तत्काळ रद्द केली आहे.
* सर्वोच्च न्यायालयातील ऑल इंडिया लॉयर्स युनियन आणि अन्य संघटनांनी न्यायालयासमोर निदर्शने केली. त्यांनी म्हटले, 'हा हल्ला एका व्यक्तीवर नाही, तर भारतीय न्यायव्यवस्थेच्या स्वातंत्र्यावर आहे.'

#### राजकीय प्रतिक्रिया

* काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी या घटनेचा निषेध करत म्हटले की, 'हा हल्ला लोकशाही आणि राज्यघटनेवरील थेट प्रहार आहे.'
* सोनिया गांधी यांनी ट्विट करून म्हटले, 'न्यायसंस्थेवरील विश्वास डळमळीत करण्याचा हा कट आहे. देशातील प्रत्येक नागरिकाने याचा निषेध करावा.'
*राष्ट्रवादी काँग्रेसचे रोहित पवार यांनी महाराष्ट्रात आंदोलन करून न्यायसंस्थेचा सन्मान राखण्याचे आवाहन केले.
* रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे राजेंद्र गवई म्हणाले, 'हा भ्याडपणाचा प्रकार आहे. न्यायव्यवस्था आणि लोकशाही यांच्यावर कुणीही डोळे लावू नयेत.'

#### न्यायसंस्थेचा सन्मान अबाधित

सरन्यायाधीश भूषण गवई यांनी या घटनेवर प्रतिक्रिया देतांना सांगितले, मी विचलित होणार नाही; न्यायालयीन कामकाज नेहमीप्रमाणे सुरू राहील. त्यांच्या या संतुलित प्रतिसादाचे सर्वत्र कौतुक होत आहे. गवई कुटुंबीयांनी मात्र ही घटना 'अत्यंत वेदनादायक' असल्याची भावना व्यक्त केली.

#### प्रमुख प्रश्न

* या घटनेमुळे सर्वोच्च न्यायालयातील सुरक्षा व्यवस्था, वकील आचारसंहिता आणि न्यायसंस्थेवरील जनविश्वास या तिन्ही बाबींवर गंभीर चर्चा सुरू झाली आहे.
* तज्ज्ञांच्या मते, 'न्यायसंस्था ही लोकशाहीचा पाया आहे. तिच्यावरील प्रत्येक हल्ला म्हणजे राष्ट्राच्या संविधानावर हल्ला आहे.'

## महत्त्वाच्या बातम्या

### UNGA प्रतिनिधीघटनेची घोषणा

भारत ऑक्टोबर 2025 मध्ये होणाऱ्या 80व्या संयुक्त राष्ट्र सामान्य सभा (UNGA) मध्ये बहुपक्षीय संसदीय प्रतिनिधीघटने पाठवणार आहे. हे पाऊल भारताच्या आंतरराष्ट्रीय माध्यमातून राजकीय एकात्मतेचा सामना दाखवण्याचा प्रयत्न मानले जात आहे.

### लोकशाही निर्देशांकात भारताची स्थिती

स्वीडनस्थित V-Dem संस्थेच्या अहवालानुसार, 2025 साठी भारत 179 देशांमधून 100व्या क्रमांकावर आहे. या अहवालाने भारताचे लोकशाही स्वरूप 'निर्वाचनात्मक स्वायत्तवाद (Electoral Autocracy) प्रकारात मोडल्याचे सांगितले आहे.

### 'वन्दे मातरम' च्या 150 व्या वाढदिवसानिमित्त केंद्रीय मंत्रिमंडळाची घोषणा

केंद्र सरकारने 'वन्दे मातरम' या राष्ट्रीय गीताच्या 150व्या वर्षपूर्तीचा देशव्यापी साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे.

### माजी समाजवादी नेते जी.जी. पारीख यांचे निधन

मुम्बईमध्ये माजी समाजवादी नेता व सामाजिक कार्यकर्ते डॉ. गुनवंत गोम्पतलाल (G. G.) परिक हे 101 वर्षांच्या वयाने निधन पावले. त्यांच्या कार्यामुळे भारताच्या स्वातंत्र्य चळवळीतील आणि समाजकार्य क्षेत्रातील महत्त्वाची भर पडली.

### महाराष्ट्र 'गुंतवणूक मॅग्नेट' म्हणून उदय

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विविध गुंतवणूक बैठकीत सांगितले की महाराष्ट्र हे देशाचे 'गुंतवणूक मॅग्नेट' बनले आहे. पायाभूत सुविधा, धोरणात्मक सुधारणा आणि उद्योग अनुकूल वातावरण यामुळे उद्योगांना आकर्षित केले गेले आहे.

### मराठा आरक्षण व कुणबी प्रमाणपत्र न्यायालयीन सुनावणी

आज मुंबई उच्च न्यायालयात मराठा आरक्षण विषयक 'कुणबी प्रमाणपत्र' दिल्याबाबत महत्त्वाची सुनावणी होणार आहे. हे मुद्दे सामाजिक समता, राजकीय दबाव आणि न्यायालयीन प्रक्रिया या सर्वांच्याशी जोडलेले आहेत.

### नाशिकमधील गुन्हेगारी-विरोधाभासी राजकीय संरक्षण आरोप

नाशिकमधील गुन्हेगारी घटनांनुसार, स्थानिक राजकीय नेत्यांवर गुन्हेगारांना संरक्षण देण्याच्या आरोपांची चर्चा सुरू आहे. पोलीस आयुक्तांनी नेत्यांना 'गुन्हेगारांना राजाश्रय नको' असा सल्ला दिला आहे.

### उत्तर प्रदेशात सफाई कर्मचाऱ्यांसाठी वेतनवाढ व थेट देयक

यूपीचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी सफाईकर्मचाऱ्यांना रू. 16,000 ते रू. 20,000 दरम्यान मानदेय देण्याची घोषणा केली आहे. तसेच, त्यांच्या खात्यात थेट देयक, आरोग्य विमा वगैरे सुविधाही पुरवण्यात येणार आहेत.

#### लडाखच्या सोनम वांगचुक यांच्या समर्थनार्थ संविधान चौकात 'सेव्ह डेमॉक्रसी-सेव्ह नेशन' आंदोलन

## लोकशाही व राष्ट्रीय एकतेसाठी बहुजन संघटनांचा निर्धार



**नागपूर :** आम्ही भारताचे लोक 'सेव्ह डेमॉक्रसी, सेव्ह नेशन' या घोषणांनी आज संविधान चौक दुमदुमून गेला. लडाखचे पर्यावरण कार्यकर्ते व सामाजिक नेता सोनम वांगचुक यांच्या समर्थनार्थ आज नागपुरात विविध आंबेडकरी, बहुजन व मानवतावादी संघटनांच्या वतीने एकदिवसीय धरने आंदोलन केले. या आंदोलनात विविध समाजघटकांतील कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन लोकशाही मूल्यांचे संरक्षण आणि देशातील जनतेच्या हक्कांसाठी लढा उभारण्याचा निर्धार व्यक्त केला. धरना आंदोलनाचे नेतृत्व समता सैनिक दलाचे सुनिल सारीपुत्त, रिपब्लिकन फेडरेशनचे मिलिंद पखाले, नरेश वाहने मुक्ती वाहिनी धर्मेश प्रसेनजीत, राष्ट्रीय बौद्ध महासभा, भारतीय बौद्ध महासभेचे शंकर ढेंगरे, दार्शनिक, प्रकाश कुंभे, निळाई संस्थेचे प्रवीण कांबळे, तक्षशिला वाघधरे, त्रिलोक हजारे, छत्रपाल तामगाडगे, रिपब्लिकन पक्षाचे भूपेश थुलकर, पुष्पा बौद्ध, सुषमा भड, प्रशांत कडु, सभांजी ब्रिगेडचे सुंधाशु मोहळ, ॲड. विनोद खोबरे, लॉयर असोसिएशनचे सुधाकर पांडे, अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे मिलिंद खोब्रागडे, अनिल वासनिक, ॲड. सुधांशु पाटील, रिपब्लिकन आघाडीचे दिनेश अंडरसहारे, रजनी संबोधी, संजय गोडघाटे, शेषराव गणवीर आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे संचालन छाया खोब्रागडे यांनी केले, तर उपस्थितांनी संविधान, लोकशाही आणि पर्यावरण रक्षणासाठी अखंड लढा देण्याची शपथ घेतली.

## सरन्यायाधीश भूषण गवई यांचेवरील भ्याड हल्ल्याच्या निषेधार्थ जिल्हा न्यायालय परिसरात नारे निदर्शने आंदोलन



**नागपूर :** जिल्हा वकील संघटना नागपूर चे अध्यक्ष ॲड. रोशन बागडे व महासचिव ॲड. .मनीष रणदिवे यांचे नेतृत्वात जिल्हा न्यायालय परिसरात सरन्यायाधीश भूषण गवई यांचेवर झालेल्या भ्याड हल्ल्याच्या निषेधार्थ आज दि.7 आक्टोम्बर 2025 रोजी नारे निदर्शने आंदोलन करण्यात आले. बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्रचे माजी अध्यक्ष ॲड. अनिल गोवरदिपे, जिल्हा वकील संघटनेचे माजी अध्यक्ष ॲड. कमल सतुजा, माजी महासचिव ॲड. नितीन देशमुख यांचेसह जवळपास 500 च्या वर वकील बांधव उपस्थित होते. जिल्हा न्यायालय परिसरातुन संविधान चौकापर्यंत वकील मंडळी पायी चालत निघाले. संविधान चौकतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करुन आंदोलनाची सांगता झाली. यप्रसंगी, ॲड.रोशन बागडे यांनी भारतीय लोकशाहीच्या तीन स्तंभापैकी एक असलेल्या न्यायपालिकेच्या प्रमुखावर झालेला हा हल्ला अतिशय लाजीरवाना असुन न्यायसंस्था ही धर्मनिरपेक्ष भारतातल्या कोणत्याही धर्मास समतेचा आरसा दाखविण्याचे काम करत आलेली आहे. आणि यापुढेही न्यायसंस्थेची स्वायत्तता अबाधित राहने ही लोकशाहीच्या बळकटीसाठी गरजेचे असुन कालचा हल्ला हा लोकशाहीसाठी हा काळा दिवस असल्याचे प्रतिपादन केले. म्हणून राकेश किशोर यांची सनद रद्द करण्यात यावी जेणेकरून अशा प्रकारच्या घटनांना आळा बसेल. यावेळी डिबीएचे पदाधिकारी ॲड. उषा गुजर, ॲड. आशिष नागपूरे, ॲड. संदिप बावनगडे, ॲड. . वासुदेव कापसे, ॲड. मनोज मेंढे, ॲड. . उदय डबले, ॲड. योगेश मंडपे, कौटुंबिक न्यायालयाचे पदाधिकारी ॲड. रामनाथ सेन, ॲड. वासंती रिंके, ॲड. आदिल खान, ॲड. निलेश पानतावने, ॲड. निलेश गायधने, ॲड. श्रीरंग भोंगाडे,ॲड. विलास राऊत, ॲड. . रवि गवई , ॲड. स्मिता ताकसांडे, ॲड.स्मिता कांबळे, ॲड. विनोद खोबरे, ॲड. नितीन वासे, ॲड. . विकास कराडे, ॲड. विक्की तांबे, ॲड. सौरभ भेंडे, ॲड. लुबेश मेश्राम, ॲड. रोहन मालविय, ॲड.. बाराहाते मॅडम, ॲड. विशाखा मेश्राम, ॲड. वैभव दहिवले, ॲड. सचिन मेकाले, ॲड.. सुबोध व इतर अनेक वकीलांनी व्यक्त केले.

## देशातील 126 विद्यापीठांना ऑनलाइन अभ्यासक्रम राबवण्यास मान्यता



**पुणे :** शैक्षणिक वर्ष 2025-26 मधील जुलै-ऑगस्टच्या सत्रात ऑनलाइन पदवी, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी पात्र असलेल्या 126 विद्यापीठांची यादी विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) जाहीर केली आहे. त्यात राज्यातील नऊ विद्यापीठांचाही समावेश आहे. यूजीसीने या बाबतचे परिपत्रक प्रसिद्ध केले आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरणाअंतर्गत पारंपरिक आणि दूरस्थ पदवी, पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांसह ऑनलाइन अभ्यासक्रमांनाही यूजीसीकडून समकक्षता देण्यात आली आहे. मात्र, ऑनलाइन अभ्यासक्रम राबवण्यासाठी विद्यापीठांना यूजीसीकडून मान्यता घ्यावी लागते. त्यानुसार ऑनलाइन अभ्यासक्रम राबवण्यासाठी पात्र ठरलेल्या केंद्रीय, खासगी, अभिमत, राज्य विद्यापीठांची यादी, तसेच अभ्यासक्रम राबवण्याबाबतची नियमावली प्रसिद्ध करण्यात आली आहे. यूजीसीकडून कला, वाणिज्य, विज्ञान अशा विद्याशाखांतील पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रम समाविष्ट आहेत. यूजीसीच्या नियमावलीनुसार, संबंधित संस्थांना फ्रँचायझी किंवा भागीदारी पद्धतीने कोणतेही ऑनलाइन अभ्यासक्रम राबवता येणार नाहीत. अभिमत विद्यापीठे वगळता केंद्रीय, राज्य आणि खासगी विद्यापीठांना व्यवस्थापन, संगणक उपयोजन, ट्रॅव्हल आणि टुरिझम या शाखांतील पदवी, पदव्युत्तर, पदविका अभ्यासक्रमांसाठी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेची (एआयसीटीई) मान्यता घेण्याची आवश्यकता नाही, संबंधित अभ्यासक्रम विशिष्ट नियामक संस्थांच्या अखत्यारितील असल्यास त्यांच्या मान्यतांच्या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष, मंजूर विद्यार्थी संख्या आणि संबंधित अटींचे पालन करणे आवश्यक आहे,विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक परिणामांची जबाबदारीही विद्यापीठाचीच असेल, तसेच यूजीसीच्या नियमावलीतील शिक्षा संबंधित विद्यापीठाला लागू असतील.

## 2025 मधील भौतिकशास्त्रातील नोबेल पुरस्कार जाहीर

### जॉन क्लार्क, मायकेल डेव्होरेट, जॉन मार्टिनिस या तीन अमेरिकन शास्त्रज्ञांना जाहीर

**नवी दिल्ली :** भौतिकशास्त्रातील नोबेल पुरस्कार जाहीर झाला आहे. क्वांटम मेकॅनिक्समधील त्यांच्या शोधांसाठी जॉन क्लार्क, मिशेल मिशेल डेव्होरेट आणि जॉन एम. मार्टिनिस यांना नोबेल पुरस्कार देण्यात येणार आहे. हे तिन्ही नोबेल विजेते अमेरिकन शास्त्रज्ञ आहेत. स्वीडनच्या रॉयल स्वीडिश अकादमी ऑफ सायन्सेसने याची घोषणा केली.

2025 चा भौतिकशास्त्रातील नोबेल पुरस्कार कॅलिफोर्निया विद्यापीठ, बर्कलेचे जॉन क्लार्क, येल विद्यापीठाचे मिशेल एच. डेव्होरेट आणि कॅलिफोर्निया विद्यापीठ, सांता बारबरा आणि कॅलिफोर्निया विद्यापीठ, सांता बारबरा येथील जॉन एम. मार्टिनिस यांना देण्यात येणार आहे.

रॉयल स्वीडिश अकादमी ऑफ सायन्सेसने 'इलेक्ट्रिक सर्किट्समध्ये मॅक्रोस्कोपिक क्वांटम मेकॅनिकल टनेलिंग आणि एनर्जी क्वांटायझेशनचा शोध' यासाठी त्यांच्या अग्रगण्य कार्याला मान्यता दिली, जे मानवी स्तरावर क्वांटम घटना प्रदर्शित करण्याच्या शोधात एक यश आहे. विजेत्यांना 11 दशलक्ष स्वीडिश क्रोना (भारतीय रुपयांमध्ये ?10.3 कोटी), सुवर्णपदक आणि प्रमाणपत्र मिळेल.

या संशोधकांना 10 डिसेंबर रोजी स्टॉकहोम येथे होणाऱ्या एका समारंभात औपचारिकपणे पारितोषिके प्रदान केली जातील, म्हणजेच या पुरस्काराचे संस्थापक अल्फ्रेड नोबेल यांच्या पुण्यतिथी. 1901 ते 2024 दरम्यान, हा भौतिकशास्त्राचा सन्मान 118 वेळा 226 नोबेल विजेत्यांना देण्यात आला आहे. हे लक्षात घेण्यासारखे आहे की स्वीडिश उद्योगपती आणि डायनामाइटचे शोधक अल्फ्रेड नोबेल यांनी या पारितोषिकांची स्थापना केली. आर्टिफिशियल इंटेलिजेंसचे 'गॉडफादर' म्हणून ओळखले जाणारे जेफ्री हिंटन यांनी बोल्ट्झमन मशीन तयार केले, जे संगणकांना डेटामधून


### हरविले आहे

**आशीष सोमाजी जीवने,** राहणार मनीष नगर, यांचे बेसा येथिल प्लॉट नंबर 7 व प्लॉट नंबर 8, उन्नति डेवलपर्स आणि बिल्डर्स, बेसा येथिल ओरिजिनल रजिस्ट्री (मूळ प्रत) कागद पत्र हरविले आहे. ज्यांना कोणाला मिळाले असतील त्यानी कृपया जयंती मेंशन-3, प्लॉट नं. 402 मनीष नगर, नागपूर इथे आणून द्यावे किंवा आशीष जीवने यांना 9766019735 या मोबाइल नंबरवर संपर्क करावा.


## राज्य सरकारचे पूरग्रस्त शेतकऱ्यांसाठी 31 हजार 628 कोटींचं पॅकेज जाहीर

**मुंबई :** शेतकऱ्यांचे आपल्या पिकावर पोटच्या पोराप्रमाणे प्रेम असते. अशा स्थितीत पीक करपून गेले, पाण्याखाली गेले, जमीन खरडून गेल्याने पुन्हा पेरणीची स्थितीही उरली नाही. आर्थिक आणि मानसिक त्रास शेतकऱ्यांना झाला. त्याची शंभर टक्के भरपाई कुणीच देऊ शकत नाही परंतु शेतकरी पुन्हा उभा राहिला पाहिजे यासाठी पॅकेज तयार केले आहे. 68 लाख 69 हजार हेक्टर जमिनीवरील पिकांचे नुकसान झाले. 29 जिल्हे आणि 253 तालुके सरसकट मदतीच्या पॅकेजमध्ये घेतले आहेत. जिथे पिकांचे नुकसान झाले तिथे अटी शिथिल करून मदत केली जाणार आहे. राज्य सरकारने पूरग्रस्त भागातील शेतकऱ्यांसाठी 31 हजार 628 कोटींची मदत जाहीर केली आहे. या पत्रकार परिषदेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, घरांची पडझड झाली, तिथे घरे उभारली जातील, 50 हजार रूपयांची मदत दुकानदारांना करणार आहेत. दुधाळ जनावरांसाठी 37 हजार 500 रूपये मदत करण्याचा निर्णय घेतला आहे. 3 जनावरांची अट रद्द केली आहे. जेवढी जनावरे दगावली तेवढी मदत दिली जाईल. खरडून गेलेली जी जमीन आहे तिथे 47 हजार हेक्टरी रोख आणि 3 लाख रूपये हेक्टरी नरेगाच्या माध्यमातून देणार आहेत. ज्या विहिरींमध्ये गाळ गेलाय, नुकसान झाले आहे तिथे विशेष बाब म्हणून 30 हजार रूपये प्रति विहिर भरपाई दिले जाणार आहे. पायाभूत सुविधांचे जिथे नुकसान झाले




तिथे 10 हजार कोटी मदत केली जाणार आहे असे त्यांनी सांगितले.

तसेच 6175 कोटी रूपये नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना देणार आहेत. बियाणे आणि इतर कामांसाठी प्रति हेक्टर 10 हजार रुपये शेतकऱ्यांना दिले जाईल. कोरडवाहू शेतकऱ्यांना 18 हजार 500 रुपये हेक्टरी, हंगामी बागायतदार शेतकऱ्यांना 27 हजार प्रति हेक्टरी, बागायती शेतकऱ्यांना 32 हजार 500 हेक्टर मदत दिली जाईल. ज्या शेतकऱ्यांनी विमा उतरवला आहे त्यांना 17 हजार प्रति हेक्टर मदत विम्यातून केली जाणार आहे. राज्य सरकारच्या वतीने 31 हजार 628 कोटी रूपयांचे मदतीचे पॅकेज सरकारकडून दिले आहे. जास्तीत जास्त भरपाईचा पैसा दिवाळीच्या आधी देण्याचा सरकारचा प्रयत्न आहे असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले.

#### सरकारने आज घोषित केलेली मदत म्हणजे शेतकऱ्यांची थट्टा : काँग्रेस



**नागपूर :** महायुती सरकार हे शेतकऱ्यांची थट्टा करत आहेत. मराठवाड्यात जानेवारी ते सप्टेंबर मध्ये 781 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. अतिवृष्टीमध्ये गेल्या 15 दिवसात 74 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असताना आज फक्त सरकारने मदतीचे आकडे फुगवून सांगत ही तर सरकारने शेतकऱ्यांची थट्टा केल्याची टीका काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे. राज्यात शेतकऱ्यांची जमीन खरवडून निघाली आहे. त्यांची जनावर वाहून गेली आहेत अशा वेळी शेतकऱ्यांना सरसकट 50 हजार रुपये हेक्टरी मदत करण्याची अपेक्षा होती. अस असताना NDRF निकषानुसार दिलेली मदत ही तुटपुंजी आहे. याने शेतकरी उभा राहणार नाही तर उद्ध्वस्त होईल अशी टीका वडेट्टीवार यांनी केली. पंजाबसारखे राज्य केंद्राची मदत न घेता प्रति हेक्टरी 50 हजार पर्यंत मदत देऊ शकते मग महाराष्ट्रासारख्या समृद्ध राज्यात शेतकऱ्यांना ठोस मदत का दिली जात नाही? सरकारने जाहीर केलेली मदत दिवाळीच्या आधी मिळणार आहे का? शेतकऱ्यांबरोबर शेतमजूर देखील अडचणीत आला आहे, त्यांना काय मदत मिळणार, असा प्रश्न वडेट्टीवार यांनी उपस्थित केला. राज्यातील विधानसभा निवडणुकीआधी महायुतीने शेतकरी कर्जमाफीची घोषणा केली होती. आज शेतकऱ्यांना कर्जमाफीची अपेक्षा असताना त्याची घोषणा केली नाही. कर्जमाफी करणार करणार फक्त तारीख पे तारीख सरकार सांगत आहे पण नेमकी शेतकरी कर्जमाफी कधी देणार हे सरकार सांगत नाही अशी टीका विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी केली.




" माणसाने माणसाचे मूलभूत स्वातंत्र्य हिरावून घेऊ नये... "



# सर्वोच्च न्यायालयात भ्याड प्रकार जातीय मानसिकतेचा निषेध...

देशाच्या सर्वोच्च न्यायालयात, जिथे न्याय, समता आणि संविधान हे सर्वोच्च मानले जातात, तिथेच नुकतीच एक अत्यंत लज्जास्पद आणि धक्कादायक घटना घडली. सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या बेंचजवळ एका वकिलाने बूट फिरकवत हल्ला करण्याचा प्रयत्न केला. त्याचे विधान होते, 'सनातन धर्माचा अपमान सहन करणार नाही.' पण मी विचारतो, हा धर्मरक्षणाचा प्रयत्न होता का जातीय अहंकाराचा उफाळा होता? कारण, जर देशाच्या सर्वोच्च न्यायालयातील अनुसूचित जातीतील सरन्यायाधीश सुद्धा अशा अपमानजनक वर्तनाचा बळी ठरत असतील, तर सामान्य जनतेच्या सुरक्षिततेची हमी कोण देणार? ही घटना आपल्याला सांगते की, जातिव्यवस्था अजूनही या देशाच्या रंध्रांमध्ये झिरपत आहे. हीच काही न्यायाधीश मंडळी म्हणतात, 'आता अनुसूचित जाती-जमातींसाठी आर्थिक निकषांवर आरक्षण द्या, क्रिमी लेअर लागू करा.' पण मित्रांनो, आज जो माणूस सर्वोच्च न्यायालयात बसलेला आहे, त्याच्यावरही जर जात पाहून हल्ला होत असेल, तर 'आर्थिक निकष' सांगणाऱ्यांनी थोडा आत्मपरीक्षण करायला हवे. जात ही केवळ सामाजिक रचना नाही. ती आजही मानसिकतेत जिवंत आहे आणि ती मानसिकता न्यायालयात बूट फेकते, कार्यालयात अन्याय करते, समाजात विभाजन करते. क्रिमी लेअर - एक सामाजिक फसवणूक. आज सरकार क्रिमी लेअर लावून अनुसूचित जाती-जमातींचे हक्क मर्यादित करत आहे. ते म्हणतात, 'जे पुढे गेलेत, त्यांना आरक्षणाची गरज नाही.'



अनिल वैद्य
माजी न्यायाधिश
9657758555

पण मी विचारतो, जेव्हा सर्वोच्च न्यायालयातील सरन्यायाधीशांवर सुद्धा जात पाहून हल्ला होतो, तेव्हा आपण कोणाला 'पुढे गेलेले' म्हणणार? जात अजूनही ओळख ठरवते, आणि म्हणूनच 'क्रिमी लेअर' हा सामाजिक न्यायावरील एक मोठा अन्याय आहे. आरक्षण हे आर्थिक दुर्बलतेसाठी नव्हे, तर सामाजिक अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी आहे, हे विसरू नका. आपण सरन्यायाधीशांचा सन्मान करतो, पण समाजाने स्वतःलाच विचारायला हवे, आज त्यांच्यावर बूट फेकला तो जात पाहून का आर्थिक निकष पाहून? हा प्रश्न प्रत्येक सजग नागरिकाने स्वतःला विचारला पाहिजे. ही घटना आपल्याला दाखवून देते की, संविधान लिहिले गेले, कायदे झाले, पण मनं अजून बदलली नाहीत. जातीय मानसिकता अजूनही जिवंत आहे. तीच मानसिकता सामाजिक न्यायावर प्रश्नचिन्ह निर्माण करते आणि म्हणून आजची गरज आहे, जातमुक्त विचारांची, मानवतेच्या मार्गाची आणि सामाजिक समतेच्या नव्या लढ्याची. ही घटना घडल्यानंतर यत्किंचितही न डगमगता न्यायमूर्ती भूषण गवई यांनी वकिलांना 'आपले काम सुरू ठेवा' असे सांगितले आणि अशा प्रकाराला 'मी घाबरणारा नाही' असे दमदारपणे सांगितले. त्या त्यांच्या शांत, संयमी आणि दृढ भूमिकेचे आम्ही कौतुक करतो आणि या भ्याड प्रकाराचा तीव्र निषेध नोंदवतो. घटना केवळ हल्ला नाही - ती संविधानावरचा आघात आहे. आज देशाच्या सर्वोच्च न्यायालयात घडलेली घटना ही केवळ एका व्यक्तीवरचा हल्ला नाही, तर संपूर्ण संविधानिक मूल्यांवरचा आणि सामाजिक न्यायाच्या तत्त्वांवरचा थेट आघात आहे.

सरन्यायाधीश भूषण गवई, जे अनुसूचित जातीतील असून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्य विचारांनी प्रेरित होऊन आपल्या कर्तृत्वाने सर्वोच्च पदावर पोहोचले आहेत, लक्षात घ्या की, न्यायालयात आरक्षण नाही. त्यांच्यावर एका वकिलाने बूट फेकत हल्ला करण्याचा प्रयत्न केला. त्याचे कारण म्हणून 'सनातन धर्माचा अपमान सहन करणार नाही' असे विधान करण्यात आले. खरा मुद्दा धर्माचा नाही जातीय अहंकाराचा आहे. वास्तव हे आहे की, भूषण गवईंना बौद्ध सरन्यायाधीश म्हणून काही अतिरेकी विचारांच्या लोकांना ते 'बघवत नाहीत.' त्यांनी एका खटल्यात विष्णू मूर्ती संदर्भात केलेल्या कायदेशीर टिप्पणीचा जातीय आणि धार्मिक पद्धतीने विपर्यास करून, त्यांना जाणीवपूर्वक लक्ष्य केले गेले. समाज माध्यमातून निंदास्पद प्रचार केला गेला. स्वतः न्यायालय किंवा सरकार कुणीही दखल घेतली नाही. परिणामी बूट फिकवण्याची हिंमत झाली. हे लक्षात घ्यावे. आजचा बूट फेकण्याचा प्रकार म्हणजे त्या द्वेषपूर्ण मोहिमेचा परिपाक आहे. सर्वोच्च न्यायालय हे न्याय, समता आणि धर्मनिरपेक्षतेचे प्रतीक आहे. त्या न्यायालयात बसलेल्या सरन्यायाधीशावर धर्माच्या नावाखाली हल्ला होणे म्हणजे न्यायव्यवस्थेच्या मूलभूत तत्त्वांवर प्रहार आहे. हा केवळ 'असंतोष' नाही. हा संविधानविरोधी आणि जातीय विचारांचा उघड प्रदर्शन आहे. 'सनातन धर्माचा अपमान' हे केवळ एक बहाणा आहे. खरा मुद्दा हा आहे की, बौद्ध न्यायाधीशाने विष्णू मूर्तीविषयी भाष्य करण्याचे धाडस केले, आमच्या अधिकार क्षेत्रात नाही म्हटले आणि त्यामुळे त्यांच्यावर जातीय मानसिकतेने संताप व्यक्त केला.



अशा मानसिकतेने समाजाला न्याय, समता आणि बंधुता या संविधानिक मूल्यांपासून दूर नेले जाते. आम्ही या अमानवी, असभ्य आणि संविधानविरोधी कृतीचा तीव्र निषेध करतो.

सर्वोच्च न्यायालयातील सरन्यायाधीशावर अशा प्रकारे वर्तन करणे म्हणजे, देशातील प्रत्येक बहुजन, आदिवासी, अल्पसंख्याक, समाजवादी, सर्व जाती धर्माच्या पुरोगामी विचारवंतावर हल्ला करणे होय. आम्ही स्पष्ट सांगतो, धर्माच्या नावाखाली जातीय अहंकाराचा फैलाव हा देश अधिक सहन करणार नाही. संविधानाचा अपमान करणाऱ्यांवर कठोर कारवाई झालीच पाहिजे.

ही घटना पुन्हा दाखवून देते की, जातीयवादी मानसिकता अजूनही जिवंत आहे. ती उच्च शिक्षणात, न्यायसंस्थेत, प्रशासनात आणि समाजाच्या मानसिकतेत खोलवर बसलेली आहे. भूषण गवईवरचा हल्ला म्हणजे केवळ एका न्यायमूर्तीवर हल्ला नाही, तो म. फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांवर आणि संविधानावर हल्ला आहे. आज आपण सारे जागे होऊया. जाती पाती बाहेर पडू या. आपण संविधानावर विश्वास ठेवणारे आहोत. 'धम्म, न्याय आणि समानता' हीच आपली ओळख आहे.

न्यायमूर्ती भूषण गवईसोबत उभे राहणे म्हणजे न्याय, समता आणि संविधानासोबत उभे राहणे होय. आम्ही या घटनेचा ठाम, स्पष्ट आणि एकमुखी निषेध नोंदवितो. सुप्रीम कोर्टात सुनावणीदरम्यान भारताचे सरन्यायाधीश बी. आर. गवई यांच्यावर बूट फेकण्याचा प्रयत्न करणाऱ्या वकिलावर म्हणजेच राकेश किशोर यांच्यावर तात्काळ कारवाई करण्यात आली आहे. दिल्ली बार कौन्सिलने त्यांची वकिली सनद तात्काळ निलंबित केली असून, त्याची प्रत सुप्रीम कोर्ट रजिस्ट्रार कार्यालय, सर्व उच्च न्यायालये, जिल्हा न्यायालये आणि सुप्रीम कोर्ट बार असोसिएशनला पाठविण्यात आली आहे. तथापि अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्या अंतर्गत आणि भारतीय न्याय संहिता BNS अंतर्गत कारवाई झाली पाहिजे अशी भूमिका संविधानवादी नागरिकांची आहे. वकिलांचे निलंबन उद्या कधीही मागे घेतले जाऊ शकते ही काही शिक्षा नाही. निलंबन म्हणजे सनद रद्द करणे नव्हे.

हा लेख लिहत असताना बातमी आली की या घटनेचा निषेध प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, विरोधी पक्षनेते खरगे, काँग्रेस नेत्या सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांनी तसेच तामिळनाडू व केरळ राज्यांच्या मुख्यमंत्र्यांनी सुद्धा निषेध केला. परंतु बूट फिरकविला त्या राकेश किशोर वकिलाचा बूट त्याला परत करण्यात आला आणि कोणतीही फौजदारी कारवाई करण्यात आली नाही. सर्वोच्च न्यायालयात बूट फिरकविणाऱ्या बाबत अशी बोटचेपी भूमिका घेणे व त्याला सन्मानाने बूट परत देणे. त्यापूर्वी न्या. भूषण गवई यांच्या विरोधात समाज माध्यमातून निंदास्पद प्रचार सुरू होता. त्यांच्यावर कारवाई करण्यात आली नाही. एकंदरीत हे सर्व कृत्य खेदजनक आहे. ■ ■

# ब्राह्मणांमध्ये निर्ढावलेपण येते कुठून?

भारताचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांच्यावर हल्ला करण्याचा अत्यंत निंदनीय प्रयत्न एक सनातनी ब्राह्मण वकील राकेश किशोर याने केला. सुरक्षा रक्षकांनी त्यास पकडून बाहेर नेताना त्याने 'सनातन का अपमान नाही सहेगा हिंदुस्तान' अशा घोषणा दिल्याचे निदर्शनास आले आहे. ही घटना भारताच्या लोकशाही व्यवस्थेला ठोकरून लावणारी दहशतवादी घटना आहे. मात्र त्याच्या या दहशतवादी कृत्याचे समर्थन एक विशिष्ट गट समाज माध्यमातून करताना दिसतो आहे. भारताचे प्रधानमंत्री, गृहमंत्री किंवा केंद्राच्या वरिष्ठ स्तरावरून या घटनेबद्दल काहीही भाष्य अद्यापतरी करण्यात आलेले नाही. उलट सर्वोच्च न्यायालयाच्या अटर्नी जनरल कार्यालयाने संबंधित वकिलावर न्यायालयाचा अवमान प्रकरण दखल करण्यास नकार दिला आहे असे कळते. सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशावर आणि अन्य न्यायाधीशावर अशा प्रकारे बूट किंवा चप्पल फेकण्याचा हा पहिलाच प्रकार नाही. भारताचे पहिले मुस्लिम सरन्यायाधीश न्या. एम. हिदायतुल्ला यांच्यावर मनमोहन दास नावाच्या एक व्यक्तीने 13 मार्च 1968 रोजी बूट भिरकावला होता. दुसऱ्या एक घटनेत दि. 20 मार्च 2009 रोजी सर्वोच्च न्यायालयातील न्या. अरिजित पसायत आणि न्या. ए. के. गांगुली यांच्यावर पार्वती मुरली नावाच्या महिलेने चप्पल भिरकावली होती. या तिन्ही घटनांचे अवलोकन केल्यास दिसून येते की, न्यायाधीशांवर हल्ला करणारे लोक कोणी अल्पसंख्यक किंवा मागास वर्गाचे नसून तथाकथित उच्च जातीय आहेत. ब्राह्मण वर्गामध्ये हिंसक वृत्ती त्यांची जन्मजात वृत्ती आहे. वेद पुराणात वर्णीत परशुराम ते इंग्रजांच्या काळातील चाफेकर, अनंत कान्हेरे स्वतंत्र भारतातील पहिला दहशतवादी नथुराम गोडसे अशी असंख्य उदाहरणे ब्राह्मणांच्या हिंसक प्रवृत्तीची साक्ष आहेत. केंद्रात व बऱ्याच राज्यात रा. स्व. संघ-भाजप सरकार स्थापन झाल्यापासून ब्राह्मण-सवर्णांची हिंसा ही धोकादायक पातळीला पोहोचली आहे. यामुळे साहजिकच प्रश्न निर्माण होतो की, सवर्ण-ब्राह्मण जातीमध्ये हे निर्ढावलेपण कोठून येते? याचे उत्तर शोधल्यास दिसून येते की, ब्राह्मणांना ब्राह्मण म्हणून जन्मतःच जे काही अदृश लाभ केवळ जन्मामुळे मिळाले आहेत त्यामध्ये याची बीजे रुजली आहेत.

पेगी मॅकइंटोश (Peggy McIntosh) या अमेरिकन विदुषीने अमेरिकेतील तसेच युरोपातील श्वेतवर्णीय लोकांना कोणतेही कष्ट न करता केवळ जन्मामुळे जे लाभ मिळतात यावर संशोधन केले आहे. तिने White Privilege : Unpacking the Invisible Knapsack (1989) या शोधनिबंधात जे गोऱ्या वंशाच्या लोकांना केवळ त्यांच्या कातडीच्या रंगामुळे मिळतात आणि काळ्या कातडीच्या लोकांना मिळत नाहीत अशा जन्मजात मिळणाऱ्या 50 लाभांची यादी तयार केली. अमेरिका, कॅनडा तसेच अन्य अनेक युरोपियन देशांनी या संशोधनाची दखल घेऊन शिक्षण त्यांच्या व्यवस्थेमध्ये मुलाण असे लाभ घेऊन कृष्णवर्णीय लोकांसोबत भेदभाव करू नये असे शिक्षण लहानपणापासूनच विद्यार्थ्यांना देण्यास सुरुवात केली. पेगी मॅकइंटोश हिच्या निरीक्षणाच्या पार्श्वभूमीवर भारतातील ब्राह्मण जातीला मिळणाऱ्या जन्मजात लाभाची यादी केली जाऊ शकते. कोणतेही कर्तृत्व नसताना केवळ ब्राह्मण जातीत जन्मल्यामुळे ब्राह्मणांना बऱ्याच प्रकारचे लाभ मिळतात. ते असे :- 1. ब्राह्मणाचे नाव प्रसार मध्यमातुन, साहित्यातुन रोजच्या बोली भाषेतून आदरपूर्वक लिहिले, उच्चारले जाते. त्यांच्या नावाच्या पुढे पंत, पंडित, जी असे संबोधन जोडले जाते. यामुळे त्यांच्यामध्ये असलेली ज्ञानाची, नैतिकतेची कमतरता असेल तरी ती दडवली जाते. 2. ब्राह्मणांची जातओळख उघड झाल्यास त्याचा द्वेष केला जात नाही. उलट त्याला सन्मान आणि आदर दिला जातो. अन्य जातीचे तसे नाही. 3. ब्राह्मणांना देशातील कोणत्याही भागात, वस्तीत, सोसायटीत घर विकत घेणे, भाड्याने घर मिळविणे यासाठी जातीचा कधीही अडसर येत नाही. 4. ब्राह्मण आहे म्हणून त्याच्याशी सार्वजनिक स्थळे, सरकारी कार्यालये, पूजास्थाने कोणत्याही प्रकारचा भेदभाव केला जात नाही. 5. सार्वजनिक स्थळे, हॉटेल, धर्मशाळा, मंदिर, देऊळ यासारख्या ठिकाणी ब्राह्मणांना कोणत्याही आडकाठीशिवाय प्रवेश मिळतो. उलट अशा ठिकाणी त्यांचे स्वागत आणि आदरातिथ्य केले जाते. 6. ब्राह्मणांच्या खाद्य संस्कृतीला सन्मान दिला जातो. ब्राह्मणांना सोयीची शुद्ध शाकाहारी हॉटेल्स सहज उपलब्ध असतात. 7. ब्राह्मणांचे देशप्रेम व राष्ट्रनिष्ठा याबद्दल कोणीही शंका घेत नाहीत. ते राष्ट्रभक्त आहेतच हे कोणत्याही शंकेशिवाय गृहीत धरले जाते. ब्राह्मणांने कितीही वाईट स्वरूपाचे देशद्रोही कृत्य केले तरी ते त्याचे वैयक्तिक मानले जाते. त्यासाठी ब्राह्मण जातीला कधीही टार्गेट केले जात नाही. 8. ब्राह्मणांने कितीही मोठा गुन्हा, खून, बलात्कार, दहशतवादी कृत्य केले तरी त्यासाठी त्याला वैयक्तिक जबाबदार धरले जाते. 'त्यांची जातच अशी' अशा प्रकारच्या टिप्पण्या केल्या जात नाही. 9. एखाद्या ब्राह्मणांने कितीही मोठा गुन्हा केला तरी त्यास मोठी शिक्षा न होण्याची आशा असते. कारण त्याच्या प्रकरणाचा तपास त्याच्याच ब्राह्मण जातीचा उच्च दर्जाचा पोलिस अधिकारी करण्याची शक्यता अधिक असते, त्याचा खटला उच्च किंवा सर्वोच्च न्यायालयात त्याच्याच ब्राह्मण जातीच्या न्यायाधीशापुढे चालेल व त्याचा फायदा त्याला मिळेल अशी खात्री असते. 9. एखाद्या ज्ञानक्षेत्रात अत्यंत सुमार दर्जाची पात्रता असली तरी केवळ ब्राह्मण आहे म्हणून त्याला त्या विषयातील तज्ज्ञ, विद्वान म्हणून पुढे केले जाते. 10. कोणत्याही जातीच्या प्रथा, परंपरा, रूढी इत्यादीचा काहीही अभ्यास नसला तरी त्या जातीच्या संबंधी अभ्यास करण्यासाठी नेमलेल्या आयोगावर, समितीवर तज्ज्ञ म्हणून नेमणूक होण्याची संधी ब्राह्मणेत्तरांपेक्षा ब्राह्मणांना अधिक मिळते. 11. आर्थिक मागास प्रवर्गातून कमी गुण मिळवून नोकरी मिळविलेल्या, डॉक्टर बनलेल्या ब्राह्मणाच्या गुणवत्तेवर कोणीही शंका उपस्थित करत नाही. 12. मेरिट नसतानाही केवळ पैसे देऊन खाजगी संस्थेतून डॉक्टर बनलेल्या ब्राह्मणाच्या कौशल्यावर कोणीही शंका उपस्थित करत नाही.13. केवळ शिफारशीच्या आधारावर नोकरी मिळालेल्या ब्राह्मणाच्या गुणवत्तेवर कोणीही शंका उपस्थित करत नाही. 14. लेखी परीक्षेत अत्यंत कमी गुण मिळाले तरी मुलाखतीत ब्राह्मण मुलाखतकर्त्याने जात पाहून अधिक गुण देऊन निवड केलेल्या ब्राह्मण कलेक्टर किंवा अन्य अधिकारी यांच्या गुणवत्तेवर शंका घेतली जात नाही.



सुनील खोब्रागडे
मो. 9594057373

15. शिक्षण क्षेत्रात फारशी योग्यता नसताना कुलगुरू, प्रोफेसर यासारखे पद मिळण्याची ब्राह्मणांना अधिक संधी दिली जाते. कारण त्यांची विद्वत्ता जातीमुळे गृहीत धरली जाते. 16. ब्राह्मण व्यक्ती व्यवहारात अत्यंत जातीयवादी असला तरी थोडेसे उदारमतवादी लेखन केले, टीव्ही वर भूमिका मांडली तरी त्यास पुरोगामी, मानवतावादी, उदारमतवादी म्हणून गौरविले जाते. ब्राह्मणांचे लेखन भाषण हाच त्याच्या धर्मनिरपेक्षतेचा पुरावा समजला जातो. 17. 'भारतीय संस्कृती' 'हिंदू सभ्यता' याबद्दल ब्राह्मणांनाच माहिती आहे, ब्राह्मणांनीच भारतीय संस्कृती टिकवून धरली आहे असे गृहीत धरले जाते. 18. ब्राह्मणांची संस्कृती हीच राष्ट्रीय संस्कृती आहे असे गृहीत धरले जाते. ब्राह्मणांची भाषा हीच प्रमाण भाषा असे मानले जाते. ब्राह्मण म्हणतील तोच प्रवाह म्हणजे मुख्य प्रवाह, राष्ट्रीय प्रवाह असे मानले जाते. 19. आपल्या जातीच्या हिताबद्दल बोलणाऱ्या ब्राह्मणेतरास जातीवादी म्हंटले जाते. मात्र आपल्या जातीच्या हिताबद्दल बोलणाऱ्या ब्राह्मणास संस्कृतिरक्षक ठरविले जाते. 20. निम्न जातीच्या लोकांसोबत भोजन करणे, दलित, ओबीसीच्या कार्यक्रमात उपस्थित राहणे यासारख्या कृतिना ब्राह्मणांच्या समतावादी जातिनिरपेक्ष असल्याचा पुरेसा पुरावा समजला जातो. अशा कितीतरी लाभांची यादी करता येऊ शकेल. कोणत्याही कष्टाशिवाय केवळ जन्मामुळे मिळणाऱ्या लाभांमुळे ब्राह्मण जातींमध्ये कायद्याला न जुमानण्याची प्रवृत्ती निर्माण झाली आहे. आपण कायदा मोडला, गुन्हा केला तरी प्रचार माध्यमातील, प्रशासनातील, तपासयंत्रणा मधील, न्यायव्यवस्थेतील आपल्या जातीचे लोक कोणताही विधिनिषेध न बाळगता आपल्या बाजुने उभे राहतात याची खात्री ब्राह्मणांना असते. त्यांच्या गुन्हेगारी कृत्याबद्दल त्याच्या जातीला कोणताही बोल लागणार नाही याची खात्री त्यांना असते. यातूनच त्यांच्यामध्ये निर्ढावलेपणा आलेला आहे. ब्राह्मणांचे हे निर्ढावलेपण भारतीय लोकशाहीला आणि भारताच्या राष्ट्र म्हणून टिकून राहण्याला मोठा धोका आहे. ■ ■

# हा तर... न्यायसंस्थेसह देशाचा अवमान

16 सप्टेंबर 2025 रोजी सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती मा. बी. आर. गवई आणि मा. न्यायमूर्ती के. विनोद चंद्रन यांच्या पिठासमोर खजुराहो येथील जावरी मंदिरातील विष्णू मूर्तीच्या जिर्णोद्धारासंदर्भात दाखल झालेली याचिका फेटाळण्यात आली. यावेळी मा. न्यायमूर्तींनी 'देवालाच काहीतरी करायला सांगा; तुम्ही विष्णूचे भक्त असाल तर प्रार्थना करा' असा प्रतिपादनात्मक सल्ला देत, ही याचिका प्रसिद्धीसाठी दाखल केल्याचे स्पष्ट केले होते. त्यानंतरही सोशल मिडियावर चुकीच्या अर्थाने चर्चा रंगल्या, तरी मा. गवई यांनी 'आम्ही सर्व धर्मांचा आदर करतो' असे स्पष्ट विधान करून या वादाला पूर्णविराम दिला होता. तरीही काल सर्वोच्च न्यायालयात त्यांच्यासमोर एका विकृत मानसिकतेच्या व्यक्तीने जाणीवपूर्वक न्यायसंस्थेचा आणि राष्ट्राचा अवमान करून देशद्रोहाचा घृणास्पद प्रकार घडवला. हे केवळ न्यायालयातील व्यक्तीवर नव्हे तर संपूर्ण भारतीय न्यायसंस्थेवर हल्ला आहे. हा व्यक्तीचा नव्हे तर न्यायसंस्थेचा अवमान. ही घटना मा. मुख्य न्यायमूर्ती गवई यांच्या वैयक्तिक विरोधात नसून संपूर्ण न्यायव्यवस्थेचा अपमान आहे. न्यायसंस्था म्हणजे न्यायमूर्ती, वकील, कर्मचारी आणि नागरिक यांचा एकत्रित पाया आणि या संस्थेचा अपमान म्हणजेच संविधानाचा अपमान होय. मा. गवई हे बुद्धतत्त्वज्ञानाचे शिष्य असून शाक्यकुलाचे वारस आहेत. त्यांनी नेहमीच समता, बंधुभाव, आणि संविधानिक मूल्यांचा पुरस्कार केला आहे. त्यामुळे या घटनेचा निषेध करणे हे केवळ निष्ठावंत नागरिकांचे कर्तव्य नसून देशप्रेमाचे द्योतक आहे.



ॲड. सुभाष सावंगीकर
मो. 9325209492

**धर्माच्या नावाखाली विकृती :-** 'सनातन' किंवा 'हिंदू' हे धर्म नसून मनुवादी विचारसरणीने समाजात विभाजन निर्माण करण्याचे साधन म्हणून या संज्ञा वापरल्या जातात. या विचारसरणीतूनच अशी अंधश्रद्धा, जात्यांधता आणि द्वेषमूलक मानसिकता समाजात वाढवली जाते आणि त्याचाच परिणाम म्हणजे सर्वोच्च न्यायालयावर हल्ला करण्याचे धाडस दाखवले जाते.

**न्यायसंस्थेचा अपमान म्हणजे संविधानाचा अपमान :-** ही घटना म्हणजे संविधानिक मूल्ये, मानवता, लोकशाही आणि धर्मनिरपेक्षतेवर थेट हल्ला आहे. त्यामुळे केंद्र व राज्यातील सर्व घटनात्मक संस्था - ग्रामपंचायतींपासून ते राष्ट्रपतींपर्यंत सर्वांनी या घटनेचा तीव्र निषेध करणे गरजेचे आहे. देशाच्या सर्वोच्च प्रतीकांवर हल्ला करणाऱ्या एनजीओ, संघटना किंवा व्यक्तींना कायद्याच्या कचाट्यात आणणे ही काळाची गरज आहे.

**अशा मानसिकतेवर कठोर कारवाई आवश्यक :-** यापूर्वीही काही राजकीय नेत्यांवर बूटफेकच्या घटना घडल्या, परंतु त्या वैयक्तिक होत्या. मात्र ही घटना देशाच्या सर्वोच्च न्यायसंस्थेवर हल्ला आहे. तरीही मा. गवई यांनी आपल्या संयमाने आणि उदार वृत्तीने मोठेपणा दाखवला आहे. मात्र यावर केवळ एका वकिलाचा परवाना निलंबित करणे पुरेसे नाही. त्याला अशी विकृत शिकवण देणाऱ्या संस्था आणि संघटनांवरही तातडीने बंदी आणली पाहिजे. राष्ट्रपती आणि प्रधानमंत्री यांनी या घटनेची दखल घेऊन देशाला जात्यांधता, धर्मांधता आणि मनुवादी विषमतेपासून मुक्त करण्यासाठी ठोस पावले उचलली पाहिजेत. देश न्यायसंस्थेच्या बळावर उभा आहे आणि न्यायसंस्था म्हणजेच भारताचा आत्मा. तिचा अपमान म्हणजे भारताचा अपमान. ■ ■

# अंगी संविधानाचा बाणा ठेचू मनुवादी फणा

ही सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश माननीय भूषण गवई साहेब यांच्यावर हल्ला चढवून 'सनातन का अपमान नही सहेंगे' असे म्हणत त्यांचा जाहीर अपमान करण्याचा घडलेला प्रकार हा संपूर्ण मानवतेला कलंकित करणारा असून भारताला संपूर्ण जगात आपली मान खाली घालायला लावणारा भारताची आंतरराष्ट्रीय पातळीवर नाचक्की करणारा आपल्या मा. प्रधानमंत्र्यांना अमेरिकेत अदानीवर विचारलेल्या अडचणीच्या प्रश्नाला उत्तर देत असताना 'वसुधैव कुटुम्बकम' अशा पद्धतीच्या दिलेल्या उत्तराला सुद्धा अत्यंत संकुचित करणारा असा हा प्रकार आहे. घडलेल्या प्रकाराबद्दल जनसामान्यांमध्ये प्रचंड क्षोभ आहे आणि सोशल मीडियावर त्याबद्दल निषेधाचे सूर सर्वत्र उमटत असून या व्यक्तीच्या नव्हे तर संपूर्ण संविधानाच्या अपमानाची खदखद अत्यंत तीव्रतेने जनसामान्यांमध्ये व्यक्त होताना दिसते. हा प्रकार हे रोगाचे लक्षण आहे. मुळात रोग हा संघाने पेरलेल्या विषात आहे आणि या विषवल्लीला शंभरी पूर्ण झालेली आहे. माझ्या नाते संबंधातील एक मुलगी इंजीनियरिंग झालेले बेरोजगारीचा विषय निघाला तेव्हा ती म्हणाली की 'आता जे मुल हुशार आहे, ज्यांच्यामध्ये टॅलेंट आहे त्यांनाच नोकरी मिळणार' तिच्या या वाक्याचा अर्थ असा की आतापर्यंत ज्या लोकांना नोकऱ्या मिळाल्या ते सगळे नालायक होते. परंतु ती स्वतःच या नोकरीची लाभार्थी होती. अर्थात तिचे वडील काँग्रेसच्या काळात छोट्याशा नोकरीला लागले. त्यांची पोस्ट सामान्यच होती आणि छोट्याशा नोकरीवर मुलांचे शिक्षण जिल्ह्याच्या ठिकाणी घर आणि प्रतिष्ठेचे जीवन ते जगले आणि तो माणूस फार प्रामाणिक. त्यांनी आपली नोकरी अत्यंत प्रामाणिकपणे केली. सामान्य लोकांची सेवा केली. याबद्दल अपवाद नाही. परंतु आपले वडील हे सामान्य व्यक्ती होते आणि तत्कालीन शासनाच्या धोरणामुळे त्यांना ही नोकरी लागली आणि त्याचा परिपाक म्हणून आज आपण अत्यंत सुखाच्या, समाधानाच्या आणि त्यातून प्राप्त केलेल्या उच्च शैक्षणिक पात्रतेच्या अवस्थेत पोचलो याचे भान तिला राहिले नाही. बेरोजगार तरुणांमध्ये पात्रता नाही ही तुच्छता तिच्यामध्ये कुठून आली, तर घरी सगळा भाजपचाच विचार आहे. रात्रंदिवस अर्णव गोस्वामीचे चैनल सुरू असते. या मुलीचा जो बुद्धिभेद करण्यात आलेला आहे त्याच्या मुळाशी मनुवाद आहे आणि मनुवादाचा पाया हा तुच्छता आहे.



हेमंत टाले
9975807632

दुसऱ्या बाजूला मी एकदा एका लेखात मांडणी केली की या देशातली 90टक्के संपत्ती कमी अधिक प्रमाणात ही देशातल्या चार दोन उद्योगपत्यांकडे आहे. तेव्हा माझा एक मित्र मला म्हणाला, बाकी सगळे आळशी आहे. तेव्हा मी त्याला खरमरीत उत्तर दिले की दिवसा विज नसताना कडाक्याच्या थंडीत सर्वत्र काळोख गव्हाचे पीक हे कमरे इतके मोठे आणि आजूबाजूला विषारी सापांची भीती हातात टॉर्च घेऊन आपल्या पिकाला सिंचन करणाऱ्या शेतकऱ्याला आळशी ठरवणे हा शुद्ध नालायकपणा आहे आणि याच्या मुळाशी मनुवाद आहे. यज्ञ ही इराणी आर्यांची युद्ध पद्धती होती. ज्या शेतात ते यज्ञ करायचे त्या शेतातले पीक कुठलेही कष्ट न करता त्यांच्या मालकीचे व्हायचे आणि म्हणून ही लुटारूंची टोळी इथल्या कष्ट करणाऱ्या मूलनिवासी शेतकऱ्यांचा गुलाम म्हणून प्रचंड तिरस्कार करायची. आजही ती स्थिती आहे. सनातन म्हणजे साचलेपणा मा. भूषण गवई साहेबांचा जो अपमान करण्यात आला तो या साचलेपणातून करण्यात आलेला आहे. अर्थात आम्ही परंपरेने सर्वश्रेष्ठ आहोत आणि तुम्ही आमची बरोबरी कशी काय करू शकता. आता हिंदू हा धर्म नसून ती संस्कृती आहे. धर्म कठोर असतो. संस्कृती लवचिक असते आणि म्हणून हिंदू संस्कृती ही प्रवाही आहे. एकेकाळी मुलींना शिकवणे हे पाप मानल्या जात होते. हा सनातनी विचार आपण फेकून दिला आणि आज मुली प्रत्येक क्षेत्रात प्रगती पथावर आहे. प्रबोधनकार ठाकरे यांची पुस्तके भिरकावणाऱ्या त्या महिलांना लाज वाटायला पाहिजे सनातनी विचारानुसार त्यांची जागा म्हणजे पायाची खालची चप्पल. अर्थात चप्पल हा शरीराचा भाग नसतो. अगदी तसेच चातुर्ण्यामध्ये स्त्रियांचा कुठेही स्थान नव्हते आणि म्हणून आज ज्या पदावर त्या आहे ते सनातनी विचारांमुळे नसून प्रबोधनकार ठाकरे यांच्यासारख्या प्रगतिशील विचारांमुळे. प्रगतिशील विचाराचे फायदे घेऊन मनुवादाचे गोडवे गाणे ही संस्कृती नसून विनाशाकडे घेऊन जाणारी विकृती आहे. ज्यांनी प्रतिष्ठा दिली ज्यांनी सन्मान मिळवून दिला. ज्यांनी माणसासारखे जीवन प्रदान केले त्याच विचाराची पायामल्ली करणे यापेक्षा दुसरी दुर्गती नाही. पहिल्या दिवशी आपल्याला प्रतिष्ठा दिली ती भारतीय संविधानाने. जातीभेद, लिंगभेद, धर्मभेद मातीत गाडुन त्या ठिकाणी समतेचा अमृत वृक्ष लावला संविधानाने. भारतीय संविधान हे डॉ. बाबासाहेबांचे आहे हा अपप्रचार आहे. डॉ. बाबासाहेबांनी संविधानाचा प्रत्यक्ष शब्द फायनल केला हे सत्य आहे. पण गांधी नेहरू आंबेडकर भाऊसाहेब पंजाबराव देशमुख आणि भारतातील सर्व वर्गातल्या लोकांच्या सूचना स्वीकारून प्रत्येकाच्या आशा, आकांक्षा या संविधानाने पल्लवीत केल्या आहे आणि म्हणून भारतीय संविधान हे सर्वांचे आहे. हा संविधानी बाणा अंगीकारूनच आपण मनुवादी फणा ठेचून काढू शकतो. सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशाचा अपमान हा भारतीय संविधानाचा अपमान असून सर्वांच्याच प्रतिष्ठा पणाला लागलेल्या असताना, आपले नेते लाचार झाले असताना आपण संवैधानिक मूल्य रुजवणे, संवैधानिक मूल्याधिष्ठित समाज निर्माण करणे हे आपले प्रथम कर्तव्य ठरते. ■ ■

# देशाचे सरन्यायाधीश यांच्यावर सर्वोच्च न्यायालयाच्या परिसरात झालेल्या भ्याड हल्ल्याचा निषेध

ही मनुवादी विचारांचा वकील राकेश किशोर याने आज सर्वोच्च न्यायालयाच्या परिसरात 'सनातन का अपमान नही सहेंगे' म्हणत देशाच्या सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश बी. आर. गवई यांच्यावर बुट भिरकावल्याचा अत्यंत नीच प्रकार केला आहे. या निंदनीय प्रकाराचा जाहीर निषेध. देशाचे सरन्यायाधीश यांच्यावर झालेला हल्ला हा केवळ व्यक्तीवरचा हल्ला नसून, भारतीय न्यायव्यवस्था, संविधान आणि लोकशाही व्यवस्थेवर झालेला गंभीर प्रहार आहे. या भ्याड कृत्याचा आम्ही तीव्र शब्दांत निषेध करतो. न्यायव्यवस्था हीच लोकशाहीची खरी हमी आहे आणि त्या व्यवस्थेचे सर्वोच्च पद भूषविणाऱ्या व्यक्तीवरच जर अशा प्रकारचा हल्ला झाला, तर तो संपूर्ण राष्ट्रासाठी चिंताजनक आहे. पाच हजार वर्षांपासून देशाला गुलाम केलेल्या या मनुवादी, वर्णवर्चस्ववादी व्यवस्थेला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाच्या माध्यमातून मुक्त केले. त्यामुळेच आज एक दलित सरन्यायाधीश न्याय व्यवस्थेच्या सर्वोच्च पदावर विराजमान झालेले या मनुवाद्यांना सहन होत नाही. सरन्यायाधीश यांच्या मातोश्रींनी दोनच दिवसांपूर्वी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यक्रमाला उपस्थित राहण्यास नकार दिला होता.लोकशाहीच्या पाया रचणाऱ्या प्रमुख खांबांमध्ये न्यायव्यवस्था ही सर्वात महत्त्वाची आहे. या न्यायव्यवस्थेचे सर्वोच्च पद भूषविणाऱ्या सरन्यायाधीशांवरच जर हल्ला घडला, तर तो केवळ एखाद्या व्यक्तीवर झालेला आघात नसून, भारतीय संविधान, कायदा आणि लोकशाही व्यवस्थेवरच झालेला थेट प्रहार आहे. असा हल्ला हा न्यायव्यवस्थेची प्रतिष्ठा डागाळण्याचा, समाजात भीती आणि असुरक्षिततेचे वातावरण निर्माण करण्याचा, तसेच न्यायावरचा विश्वास डळमळीत करण्याचा कपटी प्रयत्न आहे. सर्वोच्च न्यायालयाचा परिसर जो देशातील न्यायमंदिर मानला जातो तिथेच अशा प्रकारची घटना घडणे हे अतिशय चिंताजनक आहे. हा देश संविधानाने दिलेल्या स्वातंत्र्य, समता आणि बंधूतेच्या मुल्यांवर उभा आहे. संविधानाने दिलेल्या सामाजिक न्याय आणि समान संधीच्या तत्वामुळे मनुवाद्यांच्या पोटात मळमळ होत आहे. आज देशात उजव्या विचारांची सत्ता आहे, विषमतावादी आरएसएसने शतकपूर्ती केलेली आहे, अशा काळात एक दलित व्यक्ती न्यायपीठाच्या सर्वोच्च पदावर बसलेला या मनुवाद्यांच्या डोळ्यात खुपत आहे. लोकशाही शासनपद्धती आणि कायद्याचे राज्य या मनुवाद्यांना उलथवून टाकून मनुवादी व्यवस्था पुनर्स्थापित करायची आहे. हेच त्यांच्या अखंड भारताचे स्वप्न आहे. भ्याडपणे हल्ला करणाऱ्यांचा निषेध करणे पुरेसे नाही, तर अशा प्रवृत्तींचा कायमस्वरूपी बंदोबस्त करणे गरजेचे आहे. गुन्हेगारांना तातडीने अटक करून कठोरात कठोर शिक्षा देणे हे न्यायव्यवस्थेप्रती खरी बांधिलकी ठरेल. या घटनेमुळे नागरिकांमध्ये संताप आहे आणि हा संताप स्वाभाविकही आहे. कारण सरन्यायाधीशांवर हल्ला म्हणजे देशातील सामान्य माणसाच्या हक्कांवर आणि सुरक्षिततेवर हल्ला होय. समाजाने, माध्यमांनी आणि सत्ताधाऱ्यांनी मिळून या प्रकरणात स्पष्ट व ठाम भूमिका घेतली पाहिजे. न्यायालयाची प्रतिष्ठा, संविधानावरील विश्वास आणि लोकशाहीचे रक्षण ही आपल्या सर्वांचीच जबाबदारी आहे. या घटनेत सामील आरोपींना तात्काळ अटक करून कठोरात कठोर शिक्षा दिली जावी, अशी आमची ठाम मागणी आहे. न्यायालयाचे गौरव, प्रतिष्ठा आणि स्वायत्तता यांचे रक्षण करणे हे सर्वसामान्य जनतेचे, माध्यमांचे तसेच शासनाचे सामूहिक कर्तव्य आहे. सरन्यायाधीशांवर हल्ला म्हणजे न्यायाच्या मंदिरातील शुद्धतेवर आघात! लोकशाहीत हा अपराध कधीच सहन केला जाणार नाही. ■ ■



प्रविण बागडे
9923620919

# सरन्यायाधीशांवर भर न्यायालयात हल्ला करून अपमान करण्याचा प्रयत्न निषेधापलिकडचा...



ई. झेड. खोब्रागडे
9923756900

ही घटना सर्वांना विचलित करणारी आहे. सर्वोच्च न्यायालयावर अतिरेकी स्वरूपाचा हल्ला आहे असे या घटनेकडे judiciary व executive ने पाहावे आणि कठोर शिक्षा करावी, माफी नाही. या घटनेमुळे आम्ही व्यथित आहोत. जातीयवाद या पलीकडील ही घटना आहे. जातीवरून अपमान तर आहेच. atrocity चा गुन्हा दाखल केला पाहिजे. न्यायालयाचा अवमान आहे, यासाठी कारवाही झाली पाहिजे. या घटनेमागे सोची समजी साजिश आहे. बीमोड झाला पाहिजे. वर्ण वर्चस्ववाद्यांचे गोडवे गाणाऱ्यांनी अंतर्मुख होऊन विचार करणे आवश्यक आहे. सर्वोच्च न्यायालयात असे घडत असेल आणि कठोर कारवाही झाली नाही तर इतर न्यायालयात असे प्रकार वाढण्याची शक्यता वाढेल. संविधानाचे रक्षणकर्ते सुरक्षित नसतील, अपमानित होत असतील, भीती युक्त वातावरणात असतील तर न्याय कसा होणार? अन्याय, अत्याचार, अपमान कोणीही सहन करू नये. त्याविरुद्ध बोलले पाहिजे. विचलित झालेच पाहिजे. काही वर्षापूर्वी मी एक लेख लिहला होता, प्रशासनात जातीयवाद. आता एक पुस्तक, प्रशासनात आंबेडकरवाद या नावाने प्रकाशित केले. आम्ही संविधानाची एकनिष्ठ असलो पाहिजे, वर्तनातून दिसले पाहिजे. संविधान विरोधी जे कोणी असतील ते मित्र होऊ शकत नाही. अशा प्रवृत्तीचा बीमोड केला पाहिजे. ■ ■




# सुगत बुद्ध विहार

वंदना पौर्णिमा उत्सव, धम्मचक्र प्रवर्तन दिन, बुद्ध, फुले, शाहू, आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. सुंदर बागेत विपश्यना केंद्र आहे.

आमदार विकास ठाकरे, पश्चिम नागपूर विधानसभा क्षेत्र, महानगरपालिका क्षेत्रात मूलभूत सोयीसुविधांच्या विकासासाठी विशेष तरतूद, कामाचे नाव, प्रभाग क्र. 10, सुगत कॉलनी पोलीस लाईन मागे. जाफर नगर, नागपूर येथे विपश्यना भवनाचे काम पूर्ण झाले आहे.

गीता रंगारी, रमेश गेडाम आदी सक्रीय आहेत.

संवाद मित्र, डी.आर. कांबळे
8600924170

# सरन्यायधिशावर झालेला हल्ला हा लोकशाहीवरील हल्ला! : अशोक सरस्वती बौध्द




**नागपूर :** 6 ऑक्टोबर,2025 रोजी सर्वोच्च न्यायालयात सरन्यायाधीश भूषण गवई यांचेवर किशोर नावाच्या ब्राम्हण वकिलाने हल्ला केला तो हल्ला व्यक्तीवर नसून लोकशाहीवर, संविधानावर, समता, न्याय, बंधुत्वावर झालेला हल्ला होय म्हणून एक भारतीय म्हणून प्रत्येकाने त्याचा निषेध केला पाहिजे. हे विष राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने, भाजपने देशात पसरवले आहे.त्याला सरकारची फुस आहे म्हणून भारत सरकारचा ,नरेंद्र मोदी,अमित शहा आणि मोहन भागवत यांचा निषेध केला पाहिजे असे आवाहन बुध्द विहार समन्वय समितीचे अध्यक्ष अशोक सरस्वती बौध्द यांनी केले. दि. 7 ऑक्टोबर, 2025 रोजी अण्णा भाऊ साठे पुतळा दीक्षा भूमी परिसर नागपूर येथे दुपारी दोन ते तीन वाजता सरन्यायधिश भूषण गवई यांचेवरील हल्ल्याचा आणि सोनम वांगचुक यांना तुरुंगात टाकण्याचा निषेध करण्यासाठी निदर्षणे करण्यात आली होती. बुद्ध विहार समन्वय समिती,भारतीय बौध्द महासभा, कास्ट्राईब संघटना,राष्ट्रीय बौध्द महासभा,मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष विविध संघटना या आंदोलनात सहभागी झाले होते. पोलिस उपायुक्त शेळके साहेब यांनी आंदोलन स्थळी येऊन स्वीकारले.ते निवेदन ते राष्टपतीला पाठवतील.कॉम्रेड अरूण लाटकर, कॉम्रेड साठे,भारतीय बौध्द महासभा राज्य संघटक भीमराव फुसे,बुध्द विहार समन्वय समिती कार्याध्यक्ष प्रा. घनशाम धाबर्डे, महीला कार्यकर्त्या डॉ. माधुरी लोखंडे, सुचिता बुरबुरे, कविता लांडगे, राष्ट्रीय बौध्द महासभा राज्य अध्यक्ष शुद्धोधन बडवणे, भिक्खू राहुल बोधी यांनी आपल्या भाषणातून निषेध केला.

# सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशांवरील हल्ला प्रकरणी संप

**पवनी :** वकील संघाचे वतीने एक दिवसाचा लाक्षणिक संप आपल्या देशाच्या सर्वोच्च न्यायालयात माथेफिरू प्रवृत्तीच्या एका वकील व्यक्तीने जातीवादी प्रवृत्तीतून केलेला प्रकार हा अत्यंत निंदनीय असून भारताच्या सरन्यायाधीशावर भर न्यायालयात जोडा भिरकावून हल्ला करण्याचा प्रयत्न केला.या घटनेचा बार असोसिएशन पवनी च्या वतीने तीव्र निषेध करण्यात आला. आपल्या सन्माननीय सरन्यायाधीशांवर अशा प्रकारचा हल्ला करण्याचा प्रयत्न देशातील कोणताही सुजाण नागरिक खपवून घेणार नाही.न्यायव्यवस्थेचे स्वातंर्त्य अबाधित राहण्यासाठी आम्ही सर्वजण कटिबद्ध आहोत. या सर्व प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात येऊन व दोषी व्यक्तीच्या विरोधात कारवाई करण्यात येऊन कठोर शिक्षा देण्यात यावी ,अशी मागणी करण्यात आली. भारताचे सर न्यायाधीश मा .भूषण गवई यांच्यावर सुनावणीच्या दरम्यान एका जातीयवादी माथेफिरू वकीलाने पायातील जोडा फेकून



मारण्याचा प्रयत्न केला. अशा वकीलाचा व अशा मानसिकतेचा जाहीर निषेध करण्यात आला.तसेच पवनी वकील संघाचे वतीने एक दिवसाचा लाक्षणिक संप पुकारण्यात येवून कोर्टात कामकाज केले नाही. या संपात पवनी वकील संघाचे जेष्ठ विधिज्ञ ॲड. महेंद्र गोस्वामी, अध्यक्ष ॲड. के.एम. जिभकाटे, सचिव ॲड. कावेरी शेंडे, ॲड. दिपक देशमुख, ॲड. काटेखाये, ॲड. तलमले, ॲड. सुखदेवे, ॲड. गजभिये, ॲड. बनारसे, ॲड. कावळे, ॲड. सावरकर, ॲड. श्रद्धा कामथे, ॲड. ॠजुजा अवसरे, ॲड. स्नेहल पारधी, ॲड. भुरे, ॲड. विवेक देशमुख, ॲड. बनसोड सह सर्व सन्माननीय वकील संघाचे सदस्य उपस्थित होते.



# एकजुट लेणी अभ्यास प्रचारक समूह, महाराष्ट्र राज्यचा 'कोल्हापूर जिल्ह्यातील लेणी अभ्यास दौरा'

**मुंबई :** दि. 5 ऑक्टोबर 2025 रोजी मुंबई च्या एकजुट लेणी अभ्यास प्रचारक समूह, महाराष्ट्र राज्य चा 'कोल्हापूर जिल्ह्यातील लेणी अभ्यास दौरा संपन्न झाला. या अभ्यास दौऱ्यात 25 लेणी संवर्धकानी सहभाग घेतला होता. या दौऱ्यात पन्हाळा किल्ला आणि तेथील लेण्या, मसाई पठार लेणी व पोहाळे लेणीचा अभ्यास केला. तसेच पोहाळे लेणीवरील युवा बौद्ध धम्म परिषद महाराष्ट्र व कर्नाटक राज्य आयोजित 'ऐतिहासिक लेणी परिषद' मध्ये देखील उत्स्फूर्त सहभाग घेतला. या अभ्यास दौऱ्याप्रसंगी एकजूटचे संस्थापक अध्यक्ष यांनी सांगितले की आमचा समूह महाराष्ट्रातील परिचित/अपरिचित लेण्यावर कार्यशाळा राबवत असून मोठ्या संख्येने यामध्ये उपासक सहभागी होत आहेत. गेल्या महिन्यात आम्ही अलिबाग येथील चौलच्या 2 बौद्ध लेण्यावर कार्यशाळा आयोजित केली होती. येत्या 21-23 ऑक्टोबर रोजी आम्ही जुन्नर परिसर अभ्यास दौऱ्याचे आयोजन केले आहे. त्यामध्ये सर्वांनी सहभागी व्हावे असे आवाहन देखील केले आहे.

# सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावरील हल्ल्याच्या निषेधार्थ बारामतीत आंदोलन

**बारामती :** सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावरील हल्ल्याच्या निषेधार्थ बारामतीत आंदोलन करण्यात आले. बारामतीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर खासदार सुप्रिया सुळे, राष्ट्रवादी



काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे नेते युगेंद्र पवार यांच्यासह तालुक्यातील विविध वकील आणि राजकीय पदाधिकाऱ्यांनी मौन पाळत आंदोलन केले. यावेळी सुप्रिया सुळे म्हणाल्या, देश संविधानानुसार चालतो. मात्र, हे समाजातील वितुष्ट कशामुळे निर्माण झाले आहे, हे शोधण्याची गरज आहे. या देशाला आता आत्मचिंतनाची गरज आहे. सरन्यायाधीश पद हे देशाच्या लोकशाहीचे सर्वोच्च पद आहे. या पदावरील व्यक्तीवर अशा प्रकारचा हल्ला करणे हे अत्यंत निषेधार्थ असून, हा देशातील काळ दिवस आहे. भूषण गवई हे अमरावतीचे म्हणजेच महाराष्ट्राचे असले तरी आज संपूर्ण देशाचे मानाचे स्थान असलेले सरन्यायाधीश आहेत. त्यांच्या बाबतीत असे होण्यामुळे या देशातील कायदा आणि सुव्यवस्था कोणत्या स्तरावर येऊन पोहोचले आहे हे आपल्या लक्षात येते. यंदा महाराष्ट्रात प्रचंड मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी झाली आहे. तसेच काकीचे निधन झाले आहे. त्यामुळे दिवाळी साजरी करायची की नाही, हा एक मोठा प्रश्न आहे. कुटुंबात अजून तशी चर्चा झालेली नाही. चर्चा झाल्यावर पुढील निर्णय घेतला जाईल, असे खासदार सुप्रिया सुळे यांनी सांगितले.

# 69 व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या दुर्मिळ छायाचित्रांचे प्रदर्शन

**नागपूर :** 69 व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या निमित्ताने सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, नागपूर आणि बौद्ध इतिहास व संस्कृती संशोधन संस्था संचालित संग्राहक दिलीप वानखेडे स्मृती नागार्जुन संग्रहालय, कामठी यांच्या संयुक्त विद्यमाने विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या दुर्मिळ छायाचित्रांचे तीन दिवसीय प्रदर्शन सामाजिक न्याय विभागाच्या सभागृहात, दीक्षाभूमी रोड, नागपूर येथे आयोजित करण्यात आले.

या प्रदर्शनाचे उद्घाटन महाराष्ट्र राज्याचे सामाजिक न्यायमंत्री संजय सिरसाट यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाला विशेष अतिथी. डॉ. हर्षदीप कांबळे (ढ्रस), प्रधान सचिव - सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग; सुनील वारे (ढ्रग्रस), महानिदेशक - बार्टी; तसेच प्रमुख अतिथी डॉ. सिद्धार्थ गायकवाड आणि प्रसाद कुलकर्णी (प्रादेशिक उपायुक्त, सामाजिक न्याय विभाग) उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सुकेशिनी तेलगोटे, सहायक आयुक्त, सामाजिक न्याय विभाग, उपस्थित होत्या.



कार्यक्रमाचे मार्गदर्शन वं. भदंत नाग दिपंकर महास्थविर (मुख्य प्रवर्तक, बौद्ध इतिहास व संस्कृती संशोधन संस्था) यांनी केले, तर संस्थेच्या उपाध्यक्षा कल्पना दिलीप वानखेडे यांनी मान्यवरांचे स्वागत केले.

प्रदर्शनात 1918 ते 1956 या कालखंडातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या क्रांतिकारक जीवन प्रवासाचे दुर्मिळ छायाचित्रे, तसेच चित्रकार देवेंद्र कडबे (पुणे) यांनी साकारलेली तथागत गौतम बुद्ध यांच्या जीवन प्रवासाची कलात्मक चित्रे पोस्टर रूपात प्रदर्शित करण्यात आली. त्यासोबतच भारत सरकारने प्रकाशित केलेली डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि विविध बुद्धरूपांची टपाल तिकिटेही पाहण्यासाठी मांडण्यात आली होती.

दीक्षाभूमीला मानवंदना देण्यासाठी देशभरातून आलेल्या लाखो अनुयायांनी या प्रदर्शनाला भेट दिली. विशेषतः इतर राज्यांतील अनुयायांनी डॉ. बाबासाहेबांच्या जीवन प्रवासाचे दर्शन घेताना अभिप्राय नोंदवले आणि त्यातून त्यांना प्रेरणादायी ऊर्जा मिळाल्याचे सांगितले.

या प्रदर्शनाच्या यशस्वी आयोजनात सुकेशिनी तेलगोटे यांचे विशेष सहकार्य लाभले. उपसंग्राहक प्रमोद कुंभारे यांनी मार्गदर्शन केले, तर व्यवस्थापनाची जबाबदारी हर्षवर्धन वानखेडे यांनी निभावली. या आयोजनात शुशोधन पाटील, प्रमोद टेंभुर्णे, अनिल बेंदले, ॲड. बागडे, चंदू पाटील, अविनाश वानखेडे, संजय वानखेडे, यश कुर्वे, सक्षम वानखेडे व संघरक्षित पिल्लेवान यांनी श्रमदान केले.

कार्यक्रमातील मान्यवरांनी संग्राहक स्मृतीशेष दिलीप वानखेडे यांच्या कार्याचे तसेच बौद्ध इतिहास आणि संस्कृती संशोधन संस्थेच्या उपक्रमाचे कौतुक करून संग्रहालयाच्या प्रगतीसाठी शुभेच्छा दिल्या.

## महत्वाचे

### विद्युत कर्मचाऱ्यांचा सेवाभावी उपक्रम



**नागपूर :** 69 व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त दीक्षाभूमीवर महावितरण, महापारेषण व महानिर्मितीतील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी भोजनदान, पुस्तकदान, माहिती पुस्तिका वितरण, मोफत अल्पोपहार व प्याऊ अशा सेवाभावी उपक्रमांचे आयोजन केले. कार्यक्रमाचे उद्घाटन महावितरणचे मुख्य अभियंता दिलीप दोडके यांनी केले. यावेळी सुहास रंगारी, सतीश अणे, हरिष गजबे, राजेश नाईक यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. महावितरणतर्फे उभारलेल्या माहिती दालनात सौर कृषीपंप, प्रधानमंत्री सूर्यघर यांसारख्या योजनांची माहिती नागरिकांना देण्यात आली. हजारो अनुयायांनी दालनाला भेट दिली. मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटनेतर्फे मोफत अल्पोपहार व प्याऊची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. या उपक्रमामुळे दीक्षाभूमीवर आलेल्या अनुयायांना मोठा दिलासा मिळाला.

### सम्राट अशोक सिनियर सिटीझन कौन्सिलची स्थापना



**नागपूर :** सम्राट अशोक बुद्ध विहार काशीनगर, नागपूर येथे जेष्ठ नागरिक दिनाचे औचित्य साधून सम्राट अशोक सिनियर सिटीझन कौन्सिलची स्थापना करण्यात आली व कार्यालयाचे उद्घाटन निरज वैरागडे अधिक्षक अभियंता यांच्या हस्ते करण्यात आले. देशात 20 कोटी जवळपास जेष्ठ नागरिक आहेत. त्यांच्या आवश्यकता, वैद्यकीय व इतर सोयी पुरविण्यासाठी सरकार जेष्ठ नागरिकांसाठी वेगवेगळ्या योजना आखतात. परंतु त्यांच्यापर्यंत पोहचत नाही. यासाठी या संघटनेच्या माध्यमातून जेष्ठ नागरिकांनी एकत्र येऊन सम्राट अशोक सिनियर सिटीझन कौन्सिलची स्थापना करण्याचा निर्णय घेतला. 2 ऑक्टोबर विजयादशमी दिनी कार्यालयाचे उद्घाटन झाले. या कौन्सिलचे मुख्य संयोजक म्हणून डॉ. भूषण भस्मे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. सदस्य गुलाब हुमने, पुर्णा शंभरकर, काशीनाथ बडवाईक, दिलीप सुर्यवंशी, पंढरी ढाकणे, कृष्णा मनोहर, नामदेव चौधरी, रमेश मोडक, रमेश बनसोड, अंकुश मेंढे, डॉ. अविनाश गेडाम, मोरेश्वर गजभिये, वासुदेव गायकवाड, धनराज गोटेकर, रविंद्र खोब्रागडे, चंद्रभान मून, हरिष काळे, युवराज गवळी आदी सदस्य सहभागी झाले.

# देशातील संवैधानिक अधिकार संपुष्टात येत आहेत : नागसेन सोनारे

**नागपूर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर सेंटर फॉर जस्टिस अँड पीस (ए.सी.जे.पी.)च्या वतीने 69व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर मिशन, लष्करीबाग रोड, उत्तर नागपूर येथे दि. केंद्रीय सभेचे आयोजन करण्यात आले. या सभेच्या अध्यक्षस्थानी ए.सी.जे.पी.चे राष्ट्रीय अध्यक्ष नागसेन सोनारे होते.



अध्यक्षीय मनोगतात बोलतांना नागसेन सोनारे म्हणाले की, 'बेरोजगारी, महागाई वाढत असून, शिक्षणाचे खाजगीकरण करून आरक्षण संपविण्याचा प्रयत्न सुरू आहे. त्यामुळे सर्वसामान्यांना न्याय मिळवणे अधिक कठीण झाले आहे.'

या पार्श्वभूमीवर जनतेने सतर्क राहण्याचे आवाहन त्यांनी केले. सभेला प्रमुख पाहुणे राष्ट्रीय महासचिव जागेश सोमकुवर व पी. के. जे. चव्हाण (महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष) उपस्थित होते. आपल्या मनोगतात चव्हाण यांनी आपली जबाबदारी प्रदेश कार्याध्यक्षाकडे सोपविण्याची घोषणा केली. त्यानंतर राष्ट्रीय अध्यक्ष नागसेन सोनारे यांनी देवेंद्र ताराचंद घरडे यांची महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष म्हणून नियुक्ती जाहीर करून स्वागत केले. तसेच, प्रदेश कार्यकारिणीच्या निर्णयानुसार पुरुषोत्तम पंचभाई यांची नागपूर शहर मार्गदर्शक म्हणून, दीपा फुलेकर यांची महिला आघाडी प्रमुख म्हणून आणि जानकीशरण साहू यांची शहर उपाध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली.

सभेत भंडाऱ्याचे देवेंद्र सोनटक्के, कवी भोला सर्वर (अध्यक्ष), रितेश बनसोड (महासचिव), तसेच अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन ॲड. वंदना शहारे यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. नंदा भगत यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अजय वासनिक, मंगला नांदगावे, तुषार वालदे, संजय गजभिये, किरण फुलझेले, अमर भांगे, बी. एस. लोणारे, विजय सुरवाडे आदींनी विशेष परिश्रम घेतले.

# पाच दशकांपासून कामठीच्या महिला उपासिकांचा प्रेरणादायी उपक्रम



**नागपूर :** दीक्षाभूमीवर दरवर्षी धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त देशभरातून येणाऱ्या भिक्खू संघ व अनुयायांच्या भोजनाची कोणतीही व्यवस्था नसल्याची खंत लक्षात घेऊन, कामठी येथील बिडी कामगार महिलांनी एकत्र येऊन पाच दशकांपूर्वी सुरू केलेला भोजनदानाचा उपक्रम आजही अखंडपणे सुरू आहे. महामायावती महिला उपासिका संस्थेच्या वतीने उपासिका वंचळा गजभिये, सुलका बोरकर, गोपिका मेश्राम, जसु पाटील, जुना बोरकर, कचरा आटे, तुळसा मेश्राम, सीता मेश्राम, चंद्रभागा रामटेके, कृष्णा भिवगडे, सरस्वती रामटेके, सत्यफुला वाहाणे, सारु चव्हाण, यमुना शेंडे, जाईबाई बनसोड आदी महिलांनी या उपक्रमाची मुहूर्तमेढ रोवली. सुरुवातीला वाटीभर पीठ, तांदूळ, तेल आणि काही आणे अशा अल्प साधनांतून सुरू झालेला हा उपक्रम आज लोकसहभागातून लाखो रुपयांच्या भव्य सेवाकार्यात रूपांतरित झाला आहे. आज तिसऱ्या पिढीतील महिला या परंपरेला पुढे नेत असून, शहरी आणि ग्रामीण भागातील महिलांच्या सहभागातून दरवर्षी हजारो भिक्खूंना आणि लाखो भाविकांना सलग पाच दिवस भोजनदान दिले जाते. या उपक्रमात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या माहामाया महिला सेवा संस्थेच्या कविता रामटेके, वंदना कांबळे, उर्मिला ऊके, लक्ष्मी गजभिये, कविता ढोके, जिजा मेश्राम, गिरजा रामटेके यांच्यासह शेकडो महिला सभासद उत्साहाने सहभागी होतात. या कार्यामागे भदन्त नाग दिपंकर महास्थविर यांचे मार्गदर्शन असून, व्यवस्थापन सहायक अनिल मेश्राम, राजेश ढोके, बुद्धरतन ऊके, प्रकाश गजभिये आदींचे योगदान उल्लेखनीय आहे. पाच दशकांची ही अखंड परंपरा आजही सेवाभाव, एकता आणि बौद्ध संस्कारांचा उज्ज्वल संदेश देत आहे.

# पुर्वा बहुउद्देशीय संस्थेचे संविधान वाटप, भोजन दानाचे पाचवे वर्ष

**नागपूर :** धम्मदीक्षा अनुवर्तन दिना निमित्ताने देशाच्या कानाकोपऱ्यातून येणाऱ्या हजारो जनतेच्या भोजनाची गरज लक्षात घेता व जनतेच्या काळजीपोटी पुर्वा बहुउद्देशीय संस्थेच्या अध्यक्ष अनघा मेश्राम या डॉ. बाबासाहेबांनी सांगितलेल्या आपल्या श्रमाच्या हिस्स्यातून गेली पाच वर्षापासून हजारो लोकांना भोजनाची व्यवस्था करतात. या वर्षी भंतेच्या हस्ते परित्रण पाठ करून चिवरदान केले, डॉ. सिद्धार्थ गायकवाड उपआयुक्त सामाजिक न्याय विभाग यांच्या अध्यक्षतेखाली व प्रसिद्ध कवी, गीतकार सामाजिक कार्यकर्ते खेमराज भोयर व रोशनी गायकवाड यांच्या उपस्थितीत संविधान वाटप व जवळपास पाच हजार जनसागराला मसाला भात व खिर वाटप करण्यात आली. प्रेमलता वाहणे, सिद्धार्थ गोंडाणे, कांचन डाहाट, महेश पाटील, रुपेश पाटील, सुनील ठवरे, जयंत ठवरे, दिलीप गोंडाणे, सरीता मून, पोर्णिमा लोहकरे, बबिता मेश्राम यांचे सहकार्य लाभले. यासाठी प्रथिनव मेश्राम, पुर्वा मेश्राम, आर्शिया मेश्राम व परिवारातील सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले.



Process No: 7247
Date: 6/10/2025

**Public Notice**

**IN THE COURT OF 4 JOINT CIVIL JUDGE JUNIOR DIVISION., NAGPUR**

Room No. 104
Fixed for: 14/11/2025

M.J.C. Case No. 921/2025

Applicant
1) Pratibha Baburao Sahare
2) Jaiyantkumar Baburao Sahare
3) Sangpal Baburao Sahare
4) Sachinkumar Baburao Sahare

-Versus-

Non-Applicants: Nil
Name of Deceased: 1)Baburao Tukaram Sahare Died On: 06/09/2020 R/o Padole Nagar Slum, Near Jaybhim Chowk Behind Adikane Tea Stall, Nagpur-440008

Whereas Baburao Tukaram Sahare Died On: 06/09/2020 R/o Padole Nagar Slum, Near Jaybhim Chowk Behind Adikane Tea Stall, Nagpur-440008 and Whereas Pratibha Baburao Sahare & Oth. has presented an application to this Court for grant of Legal Heir Certificate Under the Bombay Regulation Act 1827. This is to give notice to all persons who may dispute the right of the said Applicants Pratibha Baburao Sahare & Oth. as Legal Heir of the deceased to appear in the Court of 4" Joint Civil Judge Junior Division, Nagpur on 14th Day of November., 2025 at 10.30 A.M. there to enter their objections and it is hereby declared that if no sufficient objections is offered on or before the date mentioned above, the Court will forth-with proceed to receive proof of the said Applicants right and to grant them, provided they shall appear entitled thereto a Certificate of Legal Heir of the said deceased.

Given under my hand and the seal of the court, that 4th day of October., 2025.

FIL JUDGE, NAG CIV

By order of the Court
Asstt. Supdt. (T.W.)

## निधन वार्ता

### नरेंद्र बळीरामजी चहांदे



**नागपूर :** माजी उपमहापौर आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर को-आपरेटिव बँकेचे संचालक धिरेंद्र चहांदे यांचे मोठे बंधू बारसे नगर, पाचपावली, नरेंद्र बळीरामजी चहांदे यांचे दि. 7/10/2025 ला निधन झाले आहेतच. वैशालीनगरघाट येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

### सुनंदा वसंतराव वनकर



**नागपूर :** नेहरूनगर खामला येथील रहिवासी सुनंदा वसंतराव वनकर यांचे दुःखद निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय 81 होते. सहकारनगर घाट येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

### माधवराव पांडुरंग घोळस



**नागपूर :** महात्मा फुले शिक्षण संस्था, रेशीमबाग, नागपूरचे माजी सरचिटणीस माधवराव पांडुरंग घोळसे (वय 85) यांना दि. 6-10-2025 रोजी निधन झाले. त्यांच्यावर दि. 7-10-2025 रोजी 11.30 वा मानेवाडा घाट येथे अंतिम संस्कार करण्यात आले.

# दीक्षाभूमीवरून नवबौद्धांच्या हक्कासाठी लोकजागृतीचा प्रारंभ

**नागपूर :** केंद्र सरकारने 1990 मध्ये नवबौद्धांच्या हक्कांसाठी कायदा केला असला तरी आजवर त्याची अंमलबजावणी झालेली नाही. जातप्रमाणपत्राच्या प्रारूपात बदल करून अनुसूचित जातींना लागू असलेल्या सर्व सवलती धर्मांतरित बौद्धांना मिळाव्यात, या मागणीसाठी माजी समाजकल्याण मंत्री व रार्कॉचे आमदार राजकुमार बडोले यांच्या नेतृत्वात 'खासदार जागो' मोहीम राबविण्यात आली. त्यानंतर आता दीक्षाभूमीवरून लोकजागृती अभियानाचा शुभारंभ झाला असून बौद्ध जनतेचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.



आ. बडोले यांनी आतापर्यंत देशभरातील 500 पेक्षा जास्त खासदार व मंत्र्यांना मागणीपत्र पाठवले आहे. त्यांच्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, 1956 मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसोबत बौद्ध धर्म स्वीकारणारे तसेच त्यानंतर धर्मांतरित झालेले सर्व नागरिक हे कायद्यानुसार अनुसूचित जातींसाठी असलेल्या सवलतीस पात्र आहेत. संसदेत हा कायदा मंजूर झाला, राष्ट्रपतींची स्वाक्षरीही झाली; मात्र मागील 35 वर्षांपासून तो अंमलात आलेला नाही. केवळ एक परिपत्रक काढण्याची आवश्यकता असून त्यानुसार जातीच्या प्रारूपात 'बौद्ध' असा स्पष्ट उल्लेख करणे गरजेचे आहे. बडोले म्हणाले, 'मी मंत्री असताना सचिवांसोबत अनेक बैठका घेतल्या. त्यांनी परिपत्रक काढण्याचे आश्वासन दिले, परंतु निवडणुकांमुळे ते होऊ शकले नाही. आता सर्वच पक्षांच्या खासदारांना या विषयावर पत्र पाठविले आहे. लोकसभेत हा प्रश्न मांडला जावा हीच आमची अपेक्षा आहे. जर खासदारांनी दुर्लक्ष केले तर पुढील आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल.' ते पुढे म्हणाले की, 2027 च्या जनगणनेपूर्वी हा निर्णय झाला पाहिजे. यासाठी मतभेद बाजूला ठेवून सर्व संघटनांनी एकत्र येणे गरजेचे आहे. त्यासाठी लोकजागृती हाच एकमेव मार्ग असून त्याची सुरूवात दीक्षाभूमीवरून करण्यात आली आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 14 ऑक्टोबर 1956 रोजी दीक्षाभूमीवर लाखो अनुयायांना धम्मदीक्षा दिली होती. त्यामुळे लोकजागृती मोहिमेच्या प्रारंभासाठी दीक्षाभूमीची निवड करण्यात आली. या ठिकाणी राजकुमार बडोले फाऊंडेशनच्या वतीने धम्मचक्र परिवर्तन दिनी पंडाल उभारण्यात आला आहे. येथे स्वाक्षरी मोहीम राबवली जात असून 'बौद्ध हक्क कायदा' तातडीने लागू करण्याची मागणीही करण्यात येत आहे. यासोबतच बुद्धगया येथील बौद्ध महाविहार मुक्ती आंदोलनाशी एकात्मता व्यक्त करत, देशभरातील धर्मांतरित बौद्धांना अनुसूचित जातीचे आरक्षण व सर्व हक्क मिळवून देण्यासाठी एकत्रित संघर्षाची हाक देण्यात आली आहे.

बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एम.आय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. RNI No. MAHMAR 2020/84035 Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648